# स्पेशल स्किल इन कॉम्प्युटर टायपिंग फॉर इन्स्ट्रक्टर अॅण्ड स्टुडंटस परीक्षा (GCC-SSD-CTC)

## जानेवारी - २०१८

## गुणपडताळणी व उत्तरपत्रिका छायांकित प्रत मागणी अर्ज.

(Flow Chart)

www.mscepune.in वेबसाईटला भेट देऊन Login करा

⇩

Mark Verification/Xerox Copy Option बटनावर क्लिक करा

⇩

Checkout Result List

⇩

A) Click option Mark Verification if you want for appropriate Candidate.
B) Click option Xerox copy if you want for appropriate Candidate

⇩

Proceed to Payment वर Click करा.

⇩

स्क्रिनवर येणाऱ्या माहितीची खात्री करुन Pay Now बटनावर Click करावे.

⇩

Online payment च्या उपलब्ध पर्यायांपैकी सोयीस्कर पर्याय निवडावा.

⇩

आवश्यंक माहिती अचूकपणे भरुन Make payment बटनावर Click करा.

⇩

OTP/ATM PIN अचूकपणे नमूद करुन Submit करा.

⇩

Print Payment Receipt

* टीप

१. जर उमेदवाराने गुणपडताळणीसाठी रु.१००/- अगोदर भरले असतील तर पुन्हा झेरॉक्स प्रतीची मागणी केल्यास पुन्हा ४००/- रु भरावे लागतील.

२. अर्जाची प्रत व शुल्क भरलेल्या पावतीची प्रत परिषदेकडे पाठवू नये.
उपरोक्त Flow Chart प्रमाणे कार्यवाही करावी.

३. Payment यशस्वीरित्या Paid झाले नाही, तर एका तासाने पुन्हा उपरोक्त Flow Chart प्रमाणे कार्यवाही करा.

४. यासाठी ब्रॉडबॅन्ड/3G/4G सेवेचा वापर करा.

महत्वाचे :
कालमर्यादित :

जा.क्र./मरापप/जीसीसी-टीबीसी/मूल्य/२०१८/ 1934
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,
१७, डॉ. आंबेडकर मार्ग, पुणे -१
दिनांक :22/०३/२०१८

प्रति,

संस्थाचालक/ प्राचार्य,
सर्व शासनमान्य संगणक टायपिंग संस्था,
महाराष्ट्र व गोवा राज्य.

**विषय :- स्पेशल स्किल इन कॉम्प्युटर टायपिंग फॉर इन्स्ट्रक्टर ॲण्ड स्टुडंटस परीक्षा (GCC-SSD-CTC) जानेवारी - २०१८ उत्तरपत्रिका छायाप्रती मिळणे व गुणपडताळणी करणेबाबत.**

उपरोक्त विषयानुसार कळविण्यात येते की, स्पेशल स्किल इन कॉम्प्युटर टायपिंग फॉर इन्स्ट्रक्टर ॲण्ड स्टुडंटस(GCC-SSD-CTC) परीक्षेचा निकाल दिनांक २२/०३/२०१८ रोजी परिषदेच्या संकेतस्थळावर जाहीर करण्यात येत आहे. जी.सी.सी.- एस.एस.डी-सी.टी.सी. परीक्षेबाबत प्रसिध्द केलेल्या अधिसुचनेनुसार विद्यार्थ्यांना संबंधित संस्थेमार्फत गुणपडताळणी करणेकरिता व उत्तरपत्रिका छायाप्रती प्राप्त करुन घेण्यासाठी ऑनलाईन अर्ज करता येईल.

निकाल जाहीर झालेल्या दिनांकापासून १० दिवसांत परीक्षार्थीने गुणपडताळणी व उत्तरपत्रिकेच्या छायांकित प्रतीसाठी संस्थेतून विहित नमुन्यात ऑनलाईन अर्ज करणे आवश्यक आहे. गुणपडताळणीसाठी प्रति विषय रु. १००/- व उत्तरपत्रिका छायाप्रती मिळण्यासाठी प्रति विषय रु. ४००/-ऑनलाईन पध्दतीने बँक ऑफ इंडियाच्या(BOI) खाते क्र. **050010210000035 IFSC code- BKID0000500** वर संस्था Login व्दारे दिनांक ३१/०३/२०१८ पर्यंत भरावेत. याबाबतच्या सविस्तर सूचना परिषदेच्या www.mscepune.in या संकेतस्थळावर देण्यात आल्या आहेत याची नोंद घ्यावी.

(सुखदेव डेरे)
आयुक्त,
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,
पुणे - ४११ ००१

प्रत: माहितीस्तव व योग्यत्या कार्यवाहीस्तव
१. विभागीय शिक्षण उपसंचालक सर्व.
२. शिक्षणाधिकारी (माध्य.) जिल्हा परिषद सर्व.

## स्पेशल स्किल इन कॉम्प्युटर टायपिंग फॉर इन्स्ट्रक्टर ॲण्ड स्टुडंटस परीक्षा (GCC-SSD-CTC)
## जानेवारी - २०१८

### उत्तरपत्रिका छायाप्रत मागणी अर्जाबाबत सूचना.

१) विद्यार्थ्याला फक्त त्याच्या स्वत:च्याच उत्तरपत्रिकांच्या छायाप्रतीची मागणी परीक्षा परिषदेकडे करता येईल. यासाठी परीक्षा परिषदेकडे विहित पध्दतीने संबंधित संगणक टंकलेखन संस्थेमार्फत ऑनलाईन अर्ज करणे आवश्यक आहे.

२) परिपत्रकात नमूद केलेल्या कालावधीत ( १० दिवसात) परिषदेकडे विहित नमुन्यात ऑनलाईन अर्ज करता येईल. मुदतीनंतर ऑनलाईल अर्ज भरता येणार नाही. तसेच ऑफलाईन अर्जाचा विचार केला जाणार नाही. याची नोंद घ्यावी.

३) ऑनलाईन अर्जातील माहीती पूर्णपणे भरलेली असावी. अपुर्ण अर्ज सबमिट ( submit) होणार नाही.

४) उत्तरपत्रिका छायाप्रतीसाठी प्रतिविषय रु. ४००/- इतके शुल्क आकारण्यात येईल. एकदा भरलेले शुल्क कोणत्याही सबबीवर परत दिले जाणार नाही.

५) शुल्क ऑनलाईन पध्दतीने ( नेट बँकींग, क्रेडीट/ डेबीट कार्ड इ. वापरुन) भरावे लागेल.

६) उत्तरपत्रिका छायाप्रत मिळविण्यासाठी रु. ४००/- इतके शुल्क ऑनलाईन पध्दतीने भरुन अर्ज केला असल्यास त्या विषयांच्या उत्तरपत्रिकांची गुणपडताळणी करण्यात येणार असल्याने गुणपडताळणीसाठी स्वतंत्र अर्ज करण्याची आवश्यकता असणार नाही.

७) उत्तरपत्रिकेची छायाप्रतची मागणी संस्थेच्या लॉगइनमार्फत देण्यात येईल. अर्जामध्ये भ्रमणध्वनी लिहिणे आवश्यक आहे.

८) समक्ष छायाप्रत नेण्यासाठी येणाऱ्या विद्यार्थ्यास प्रवेशपत्र/ फोटोसह असलेले ओळखपत्र सोबत आणणे अनिवार्य राहील. यासाठी प्रवेशपत्र अथवा कोणतेही फोटोसह ओळखपत्र मान्य करण्यात येईल.

९) उत्तरपत्रिका छायाप्रत हस्तपोच घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी तशी पोहोच देणे बंधनकारक राहील.

१०) पुनर्मूल्यांकनाची तरतूद नसल्याने पुनर्मूल्यांकन केले जाणार नाही.

११) परीक्षेत गैरमार्गाचा अवलंब केलेल्या विद्यार्थ्यांची चौकशी झाली असल्याने त्याला माहिती अधिकाराखाली त्याच्या उत्तरपत्रिकांची छायाप्रत देण्यात येणार नाही.

१२) संबंधित विद्यार्थ्याने उत्तरपत्रिकांची छायाप्रत अन्य कोणालाही देऊ नये तसेच तिला प्रसिध्दी माध्यमाव्दारे प्रसिध्दी देण्यात येवू नये दिल्यास कारवाईस पात्र राहील.

१३) मागणी अर्ज सादर करण्याची मुदत संपल्यानंतर कोणत्याही परिस्थितीत शुल्क भरले असले तरीही उत्तरपत्रिकेची छायाप्रत देता येणार नाही. तसेच शुल्क ही परत मिळणार नाही.

१४) ऑनलाईन अर्जाची प्रत ( प्रिंट आऊट) व शुल्क भरलेल्या चलनाची प्रत परिषदेकडे पाठविण्याची आवश्यकता नाही.

(सुखदेव डेरे)
आयुक्त,
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,पुणे - १

## स्पेशल स्किल इन कॉम्प्युटर टायपिंग फॉर इन्स्ट्रक्टर अॅण्ड स्टुडंटस परीक्षा (GCC-SSD-CTC)
## जानेवारी -२०१८

### गुणपडताळणीबाबत सूचना

१) गुणपडताळणीसाठी प्रती विषय रु.१००/- (शंभर रुपये) शुल्क आकारण्यात येईल.

२) परिपत्रकात नमूद केलेल्या कालावधीत ( १० दिवसात) परिषदेकडे विहित नमुन्यात संबंधित टंकलेखन/ लघुलेखन संस्थेमार्फत ऑनलाईन अर्ज करता येईल. मुदतीनंतर अर्ज भरता येणार नाही. तसेच ऑफलाईन +अर्जाचा विचार केला जाणार नाही.

३) गुणपडताळणीसाठी एकदा भरलेले शुल्क कोणत्याही सबबीवर परत दिले जाणार नाही.

४) गुणपडताळणी अर्ज अपुर्ण भरलेला असल्यास सबमिट ( submit) होणार नाही.

५) गुणपडताळणी नंतर पुनर्मूल्यांकनाची तरतूद नाही.

६) गैरमार्गाचा अवलंब केलेल्या विद्यार्थ्यांची गुणपडताळणी करुन दिली जाणार नाही.

७) मागणी अर्ज सादर करण्याची मुदत संपल्यानंतर कोणत्याही परिस्थितीत शुल्क भरले असले तरीही उत्तरपत्रिकेची गुणपडताळणी केली जाणार नाही तसेच शुल्कही परत मिळणार नाही.

८) उत्तरपत्रिकेची गुणपडताळणी मधील बदल संस्थेच्या लॉगइनमार्फत देण्यात येईल. अर्जामध्ये भ्रमणध्वनी लिहिणे आवश्यक आहे.

९) गुणपडताळणी अर्ज उमेदवाराने ऑनलाईन सबमिट केला असेल आणि पुन्हा उत्तरपत्रिका छायाप्रत मिळण्याबाबत अर्ज सादर करावयाचा असल्यास त्यास छायाप्रतीसाठी रु.४००/- शुल्क स्वतंत्रपणे ऑनलाईन पध्दतीने भरावे लागेल.

१०) उत्तरपत्रिका छायाप्रतीसाठी अर्ज सादर केलेल्या उमेदवारांना गुणपडताळणीसाठी स्वतंत्र अर्ज करण्याची आवश्यकता नाही. म्हणजे एखाद्या विषयाच्या उत्तरपत्रिकेची छायाप्रत मागणी केल्यास त्या विषयाची गुणपडताळणीही केली जाणार आहे.

(सुखदेव डेरे)
आयुक्त,
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,
पुणे - ४११ ००१